ePaper
तर शरद पवार यांना मी सुद्धा ओळखत नाही – अजय मिश्रा

वर्ष - 7 । अंक -42 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



### आतील पानांत
- पुणेकरांसाठी आनंदाची बातमी!
- जिल्ह्यात करआकारणी आता ऑनलाइन!
- कर्नाटक निकालाचे पडसाद

www.mahaenews.com | ।गुरुवार, दि. 8 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# राष्ट्रवादीची भूमिका अन् आ. लांडगेंना 'टेन्शन'!

## आगामी निवडणुकांत विलास लांडेंशीच खुला सामना

### भाजपाला रोखण्यासाठी राष्ट्रवादीचा 'मास्टर प्लॅन

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे जिल्ह्यात राष्ट्रवादीच्या वर्चस्वाला सुरूंग लावण्यासाठी भारतीय जनता पार्टीकडून भोसरीचे आमदार महेश लांडगे यांना 'राजकीय ताकद' देण्याची रणनिती आखली आहे. त्यामुळे लांडगेंना रोखण्यासाठी आता राष्ट्रवादीने त्यांचे कट्टर प्रतिस्पर्धी माजी आमदार विलास लांडे यांना मैदानात उतरवले आहे. विलास लांडे याचा वाढदिवस (दि.१ जून) नुकतचा उत्साहात साजरा झाला. या निमित्ताने लांडे समर्थकांनी 'भावी खासदार' अशी जोरदार 'ब्रँडिंग' केली. मात्र, पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी आगामी निवडणुकीत शिरूरचा उमेदवार विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे हेच राहतील, अशी घोषणा केली.**






परिणामी, माजी आमदार विलास लांडे २०२४ मध्ये भोसरी विधानसभा निवडणुकीच्या आखाड्यात पुन्हा उतरणार हे निश्चित झाले आहे. त्यामुळे लांडगे विरुद्ध लांडे अशी तगडी 'फाईट' होणार असून, भाजपाची 'अँटी इनकंपन्सी' महाविकास आघाडीच्या पथ्यावर पडणार आहे. याचा फायदा विलास लांडे यांना होणार आहे. सध्यस्थितीला भाजपाचा पिंपरी-चिंचवडसह ग्रामीण भागातील प्रभावी स्थानिक चेहरा म्हणून पाहिले जात आहे. किंबहुना, लांडगे यांना मंत्रीमंडळात संधी देण्यात येईल, अशीही चर्चा आहे. स्थानिक पातळीवर लांडगे यांना आव्हान देणारा तोडीस तोड नेता म्हणून विलास लांडे यांच्याकडे पाहिले जाते. त्यामुळे भाजपाची नाकाबंदी करायची असेल, तर लांडे यांना ताकद देण्याशिवाय पर्याय नाही, अशी राजकीय स्थिती आहे. दुसरीकडे, आमदार लांडगे यांच्या विरोधातील सुमारे ७० हजार मतदान खेचण्याची आणि लांडगे विरोधकांची वज्रमूठ करण्याची क्षमता ही लांडे यांची जमेची बाजू आहे. त्यामुळे आगामी काळात आमदार महेश लांडगे यांची डोकेदुखी वाढण्याची दाट शक्यता आहे.

### विलास माझा कार्यकर्ता... कितीदा त्याने तयारी करायची...

» राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार आणि माजी आमदार विलास लांडे यांच्यात मनभेद आहे, अशी चर्चा अनेक दिवसांपासून सुरू होती. पण, पुण्यात लोकसभा आढावा बैठकीत अजित पवार यांनी थेट लांडे यांचे समर्थन केल्याची माहिती आहे. बैठकीत अजित पवार यांनी जाहीरपणे सांगितले की, डॉ. कोल्हे तुम्ही निवडणूक लढवणार किंवा नाही... ते एकदा जाहीर करा... कितीदा विलास लांडे यांनी तयारी करायची. तो माझा कार्यकर्ता आहे... आम्हाला पुढची दिशा ठरवता येईल..." या वाक्यामुळे डॉ. कोल्हे यांना निवडणूक लढवण्यास तयार असल्याचे सांगावे लागले, तर विलास लांडे यांना राजकीय बळ मिळाले. कारण, लांडे यांनी २००९ मध्ये ही लोकसभा लढवली आहे आणि २०१९ ची तयारीसुद्धा केली होती. आता अजित पवार यांचा बदलेली भूमिका पाहता आगामी काळात लांडे यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेतले जाईल आणि आगामी महापालिका, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत पिंपरी-चिंचवडचा स्थानिक प्रभावी चेहरा म्हणून 'प्रमोट' करण्यात येईल, असे संकेत आहेत.

### विलास लांडे यांची चाणक्यनिती...

» डॉ. अमोल कोल्हे हे राष्ट्रवादीचे 'स्टार प्रचारक' आहेत. लोकसभा उमेदवारीवर दावा करुन लांडे यांनी विधानसभेची दावेदारी 'मजबूत' केली आहे. कारण, २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत शेवटच्या क्षणापर्यंत राष्ट्रवादीतील उमेदवारीबाबत एकमत झाले नव्हते. दिवंगत विरोधी पक्षनेते दत्ताकाका साने यांनी उमेदवारीवर दावा केला होता. त्यामुळे संभाव्य बंडखोरीचा धोका ओळखून लांडे यांनी पक्षाच्या तिकीटावर शिक्कामोर्तब करण्यास 'वेट अँड वॉच'ची भूमिका ठेवली होती. भाजपाची लाट हासुद्धा 'फॅक्टर' होता. पण, निर्णय घेण्यातील वेळकाढूपणामुळे भाजपाला फायदा झाला. आता आगामी निवडणुकीत लांडेंना ही चूक करायची नाही. त्यामुळे शिरूर लोकसभा लढण्याची इच्छा व्यक्त केली आणि पक्षश्रेष्ठींकडून विधानसभेसाठी 'क्लिनचिट' मिळवली, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

# पुणेकरांसाठी आनंदाची बातमी!

## जिल्हा रुग्णालयात आता हृदयविकारावर उपचार, कमी खर्च येणार

।पुणे ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**औंध येथील जिल्हा रुग्णालयात आता हृदयविकाराच्या रुग्णांना उपचार मिळणार आहेत. त्यासाठी रुग्णालयात अत्याधुनिक कॅथलॅब केंद्र (हृदयावर उपचार देणारे केंद्र) सुरू करण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतला आहे. सद्यस्थितीत या बाबतची निविदा काढण्यात आली असून, साधारण पुढील एक वर्षात केंद्र सुरू करण्यात येणार असल्याचे जिल्हा रुग्णालय प्रशासनाने सांगितले. जिल्हा रुग्णालयात पुणे, पिंपरी-चिंचवडसह जिल्ह्यातील रुग्ण उपचार घेण्यासाठी येत असतात. मात्र, सद्यस्थितीत येथे कॅथलॅबची सुविधा उपलब्ध नाही. परिणामी येथे येणाऱ्या हृदयविकाराच्या रुग्णाला ससून, पिंपरीतील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय किंवा खासगी रुग्णालयात उपचार घेण्यासाठी जावे लागते. येथे कॅथलॅबची सुविधा सुरू झाल्यास रुग्णांची पळापळ थांबणार आहे.**



खासगी रुग्णालयात अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी करण्यासाठी जास्त पैसे लागतात. कॅथलॅब केंद्र सुरू झाल्यावर गरीब रुग्णांना येथे उपचार घेता येणार आहे. गेल्या काही वर्षांमध्ये हृदयविकाराच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. मात्र, राज्यातील जिल्हा रुग्णालयांमध्ये



हृदयविकारावर उपचार घेण्यासाठी सुविधा पूर्वी उपलब्ध नव्हती. सरकारी रुग्णालयांमध्ये ही सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून गेल्या वर्षी राज्यातील काही जिल्हा रुग्णालयांमध्ये कॅथलॅब केंद्र सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. पुणे-जिल्हा रुग्णालयात कॅथलॅब केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

### कॅथलॅब केंद्राचे फायदे -

अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी करता येणार - गरीब रुग्णांना कमी पैशात उपचार मिळणार - ग्रामीण भागातील रुग्णांना उपचार घेता येणार - ससून रुग्णालयावरील ताण कमी होण्यास मदत होणार - विविध तपासण्या करता येणार

### अखेर मेट्रो रक्तपेढीला परवानगी

» गेल्या अनेक वर्षांपासून जिल्हा रुग्णालयामधील मेट्रो रक्तपेढी प्रलंबित होती. रक्तपेढी सुरू करणे आवश्यक असतानाही रुग्णालय प्रशासन पाठपुरावा करीत नसल्याचे चित्र होते. मात्र, कित्येक वर्षांनंतर आता मेट्रो रक्तपेढी सुरू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. याबाबतची सर्व प्रक्रिया पूर्ण केली असून, रक्तपेढी सुरू करण्यासाठीची परवानगी मिळाल्याचे रुग्णालय प्रशासनाने सांगितले. पुढील महिन्यात रक्तपेढी सुरू होणार असल्याचे प्रशासनाने सांगितले. मेट्रो रक्तपेढी नसल्याने रक्तातील इतर घटक वेगळे करता येत नाहीत. ही रक्तपेढी सुरू झाल्यावर प्लाझ्मा, प्लेटलेट्स, फ्रेश प्लाझ्मा असे घटक वेगळे करता येणार आहेत; तसेच रक्तसंकलनाची क्षमता वाढणार आहे.

“ कॅथलॅब केंद्र सुरू करण्यासाठी सध्या निविदा काढण्यात आली आहे. इमारतीचे ७५ टक्के काम पूर्ण झाल्यावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. केंद्र सुरू करण्यासाठी एक वर्षाचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. मेट्रो रक्तपेढीसाठी- शुल्क भरले असून, लवकरच सुरू करण्यात येणार आहे. जिल्हा

- डॉ. नागनाथ यम्पल्ले, शल्यचिकित्सक, औंध रुग्णालय

# जिल्ह्यात करआकारणी आता ऑनलाइन!

## ई-चावडीची 500हून अधिक गावांत सुरुवात

।पुणे ।महाईन्यूज

**‘ई-चावडी’ प्रकल्पाद्वारे महसुली गावांची कृषी, अकृषक करआकारणी आता ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत आहे. त्या प्रकल्पांतर्गत पुणे जिल्ह्यातील १२३२ गावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यापैकी ५३७ गावांमध्ये आकारणी ऑनलाइन पद्धतीने करण्यात आली आहे.**

येत्या जुलैअखेर जिल्ह्यातील सर्व १९१३ गावांमधील करआकारणी पूर्णपणे ऑनलाइन




करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व कर ऑनलाइन स्वीकारले जाणार आहेत. त्यामुळे महसूल करआकारणीत सुमारे २५ ते ३० टक्के वाढ होइल, असा अंदाज जिल्हा प्रशासनाने व्यक्त केला आहे. परिणामी, शेतसाऱ्यासह अन्य कर भरण्यासाठी तलाठ्यांचे उंबरठे झिजवावे लागणार नाहीत. राज्यात फेब्रुवारीपासून सुमारे १२ हजार गावांमध्ये

### ‘पहिल्या टप्प्यात 900 गावे’

» सध्या या मोहिमेत १२३२ गावांचा समावेश करण्यात आला आहे. जूनअखेर एक हजार गावांचा, तर जुलैअखेर सर्वच १९१३ गावांचा समावेश करण्याचे ठरले आहे,’ अशी माहिती उपजिल्हाधिकारी संजय तेली यांनी दिली. या ५३७ गावांमध्ये आतापर्यंत ८६ हजार ७४४ गाव नमुन्यांची ऑनलाइन माहिती भरण्यात आली आहे. येत्या जुलैअखेर ही संख्या किमान चार लाखांपर्यंत जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### मानवी हस्तक्षेप कमी

» ‘ई-चावडी’ मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात गावात आकारल्या जाणाऱ्या कृषक करांसह अन्य कर ऑनलाइन भरता येणार आहेत. कर भरण्यासाठी तलाठ्यांच्या कार्यालयात न जाता घरबसल्या हे कर भरता येतील. ऑनलाइन कर भरण्यामुळे गावातील महसूल नेमका किती गोळा झाला आहे, याची माहिती आता एका क्लिकवर मिळणार आहे.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला मिळाले कुलगुरु

।पुणे ।महाईन्यूज ।



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदी भौतिकशास्त्र विभागाचे प्रा. सुरेश गोसावी यांची मंगळवारी नियुक्ती करण्यात आली. राज्यपाल रमेश बैस यांनी प्रा. गोसावी यांनी नियुक्ती जाहीर केली. त्यामुळे साधारण एक वर्षानंतर पुणे विद्यापीठाला पूर्णवेळ कुलगुरू मिळाले असून, ते आज, बुधवारी (७ जून) कार्यभार स्वीकारणार आहेत. प्रा. गोसावी यांच्यापुढे अभ्यास मंडळावरील नियुक्त्या, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, प्राध्यापकांची रिक्त पदे भरणे, चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम सुरू करणे, असे अनेक प्रश्न आहेत.

पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर गेल्या वर्षी १८ मे रोजी निवृत्त झाल्यानंतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांच्याकडे प्रभारी कुलगुरुपदाचा कार्यभार देण्यात आला होता. त्यानंतर आतापर्यंत विद्यापीठाला पूर्णवळे कुलगुरू नव्हते. त्यामुळे दूरगामी परिणाम करणारे शैक्षणिक धोरण राबविण्यात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर, कुलगुरू निवड समितीने राज्यपाल बैस यांच्याकडे दिलेल्या पाच नावांपैकी एकाची निवड गेल्या महिन्यातच अपेक्षित होती. त्यामध्ये प्रा. सुरेश गोसावी, प्रा. संजय ढोले, प्रा. अविनाश कुंभार, प्रा. पराग काळकर आणि प्रा. विजय फुलारी यांची नावे होते. यातून अखेर प्रा. गोसावी यांनी बाजी मारली. प्रा. गोसावी यांनी शिक्षण क्षेत्रात कामाचा ३५ वर्षांपासून अधिक अनुभव आहे. मूळचे धामणगाव (जिल्हा जळगाव) असणाऱ्या प्रा. गोसावी यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण जळगाव जिल्ह्यात पूर्ण झाले.

# शहराच्या विकासात भिकू वाघेरे यांचे योगदान!

## » माजी महापौर उषा ढोरे : स्मृतीदिनी आठवणींना उजाळा

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एवढ्या वर्षे आठवणी जागवणे. तसेच, संस्काराचा वारसा जागविण्याची परंपरा वाघेरे कुटुंबाने जपली आहे. पिंपरी-चिंचवड शहराच्या जडणघडणीत दिवंगत महापौर कै. भिकू वाघेरे-पाटील यांच्या महत्वाचा वाटा आहे. त्याच्या वारसा पुढे चालू ठेऊन त्याच्या आठवणी जाग्या कराव्यात, हीच त्यांना खरी आदरांजली आहे, असे प्रतिपादन माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे यांनी मंगळवारी (दि. 6) केले. दिवंगत महापौर कै. भिकू वाघेरे-पाटील यांच्या 37 व्या स्मृतीदिनानिमित्त पिंपरी वाघेरे येथील नवमहाराष्ट्र विद्यालयाजवळील त्यांच्या पुतळ्यास माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.**



कार्यक्रमास आमदार आण्णा बनसोडे, माजी आमदार अॅड. गौतम चाबुकस्वार, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी नगरसेविका मंगला कदम, उषा काटे, सुमन पवळे, उषा संजोग वाघेरे-पाटील, शांती सेन, राष्ट्रवादी महिला शहराध्यक्षा कविता आल्हाट, ज्येष्ठ माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, नाना काटे, प्रशांत शितोळे, अरूण बोऱ्हाडे, हनुमंत नेवाळे, हरेश बोधानी, रंगनाथशेठ कुदळे, माजी उपमहापौर प्रभाकर वाघेरे, माजी विरोधी पक्षनेता दत्ता वाघेरे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष विशाल वाकडकर, प्रवक्ते फझल शेख, पवना बँकेचे उपाध्यक्ष जयनाथ काटे, संचालक शिवाजी वाघेरे, बिपीन नाणेकर, सामाजिक कार्यकर्ते बाळाआप्पा वाघेरे, विजुशेठ काटे, दिलीप देवकर, यशवंत साखरे, संयोजक माजी महापौर संजोग वाघेरे-पाटील आदी उपस्थित होते.

माजी महापौर संजोग वाघेरे-पाटील म्हणाले की, माजी दिवंगत महापौर कै. भिकू वाघेरे-पाटील प्रतिष्ठानच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक व विधायक कामे केली जातात. गरजू विद्यार्थ्यांना सहाय केले जाते. विविध स्पर्धांचे आयोजन आणि महिला सक्षमीकरणासाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले जाते. लोगेश पंडाळकर यांनी सुत्रसंचालन केले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब वाघेरे यांनी आभार मानले.

### मान्यवरांचा सन्मान...

**» यानिमित्त पिंपरी-चिंचवड समाज भूषण पुरस्कार पर्यावरणप्रेमी हिरामण भुजबळ यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ‘एक धाव पर्यावरणासाठी’ क्रॉसकंट्री स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत विविध 14 गटांत 850 धावपटू सहभागी झाली. विजेत्यांना रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. रक्तदान शिबिरात 150 जणांनी रक्तदान केले. शिबिरासाठी आधार रक्तपेढी व वायसीएम रूग्णालयाच्या रक्तपेढीचे सहकार्य लाभले. शिबिरात नेत्र तपासणी करून मोफत चष्मे वाटप करण्यात आले. माजी नगरसेविका उषा संजोग वाघेरे-पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून होत असलेल्या मिलिटरी डेअरी फार्म उड्डाण पुलाचे आणि पॉवर हाऊस चौक ते पिंपळे सौदागर पुल रस्त्याचे काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन करण्यात आले.**

---

# पिंपरी-चिंचवडचे खेळाडू राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय मैदान गाजवणार!

## » भाजपा चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांचा विश्वास

### » ‘एमपीएल’मध्ये निवड झालेल्या शहरातील क्रिकेटपटूंचा सन्मान

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमधील खेळाडुंमध्ये गुणवत्ता आहे. त्यादृष्टीने पायाभूत सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध करण्यासाठी आम्ही प्राधान्य दिले असून, आगामी काळात शहराचे खेळाडू राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर शहराचा लौकीक वाढवतील, असा विश्वास भाजपाचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप यांनी व्यक्त केला. बहुचर्चित महाराष्ट्र प्रिमिअर लीग (MPL) स्पर्धेसाठी पिंपरी-चिंचवडमधील क्रिकेटपटू मनोज यादव आणि सोहन जमाले यांची निवड झाली.**



कोल्हापूर टस्कर्स संघातून यादव व पुणेरी बाप्पा संघाचे प्रतिनिधीत्व सोहन जमाले करणार आहेत. यानिमित्ताने जगताप यांनी त्यांचा सत्कार केला आणि स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी नगरसेवक संतोष कांबळे, भाजपा युवा मोर्चाचे शहराध्यक्ष संकेत चोंधे, सामाजिक कार्यकर्ते संतोष दुधारे, प्रशिक्षक ओंकार सपकाळ उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवडचा क्रिकेटपटू ऋतुराज गायकवाड याची ‘पुणेरी बाप्पा’ संघाचा कर्णधार म्हणून निवड झाली आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडकरांमध्ये या स्पर्धांबाबत उत्सुकता वाढली आहे. स्पर्धेच्या लिलावासाठी ३०० हून अधिक खेळाडूंचा समावेश करण्यात आला होता. यामध्ये अ गटात रणजी करंडक खेळाडूंचा समावेश होता. एमपीएलमुळे महाराष्ट्रातील उदयोन्मुख खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

**“ पिंपरी-चिंचवड शहरातील खेळाडू राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर शहराचा नावलौकिक करीत आहेत. MPL सुद्धा आपले खेळाडू गाजवतील, असा विश्वास आहे. शहराची ओळख ‘स्पोर्ट्स सिटी’ म्हणून व्हावी. यासाठी दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पुढाकाराने क्रीडा क्षेत्रातील पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्याबाबत सकारात्मक पुढाकार घेण्यात आला. हा वारसा पुढे चालवण्याचा संकल्प आम्ही केला आहे.**

**- शंकर जगताप, निवडणूक प्रमुख, चिंचवड, भाजपा.**

# कर्नाटक निकालाचे पडसाद



भाष्य
नितीन सावंत
91 9892514124



गेल्या आठवड्यात कर्नाटक विधानसभा निवडणुकांचे निकाल आले. या निकालात भाजपचा सफाया झाला. विशेष म्हणजे या निकालानंतर दोनच दिवसात महाराष्ट्र भाजपची राज्य कार्यकारिणी बैठक पुण्यात आयोजित करण्यात आली होती. हे निकाल केंद्रातील भाजप नेत्यांनी गंभीर घेतले आहेत मात्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उसने अवसान आणून या निकालांचा राज्यात काहीही परिणाम होणार नाही, असा दावा केला आहे. विशेष म्हणजे कर्नाटक मध्ये देवेंद्र फडणवीस, विनोद तावडे, आशिष शेलार हे राज्यातील महत्त्वाचे नेते ठाण मांडून होते. या नेत्यांना कर्नाटक मध्ये भाजप विजयाची पूर्ण खात्री होती. तरीसुद्धा कर्नाटकच्या जनतेने भाजपला त्यांची जागा दाखवली. कर्नाटक आणि महाराष्ट्रामध्ये एक साम्य आहे. कर्नाटक मध्ये जनता दल सेक्युलर आणि काँग्रेसचे सरकार होते हे सरकार पाडून भाजपने काँग्रेसमधील आमदारांना फोडून तेथे आपले सरकार आणले. त्याचे परिणाम काय झाले हे आपल्या समोर आहेच. महाराष्ट्रातील उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीचे सरकार पाडून भाजपने आपले सरकार आणले आहे. एकनाथ शिंदे यांनी शिवसेना आमदार फोडल्यामुळे त्यांना मुख्यमंत्री पदाची बक्षिसी दिली. तरीसुद्धा गेले नऊ महिने एकनाथ शिंदे आणि त्यांचे सरकार राज्यात प्रभाव पाडू शकलेले नाही. मुंबईत एकनाथ शिंदे यांना आपल्या शिवसेनेचा प्रभाव पाडता आलेला नाही. त्यामुळे महानगरपालिका निवडणुका पुढे ढकलण्याचा कार्यक्रम कोर्टाच्या माध्यमातून सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सामान्य जनतेला भेटतात मात्र या जनतेची काम किती पुर्णत्वास जातात, हे त्यांचे कार्यालयच सांगू शकेल. मुंबईतील नालेसफाई वरून आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपमध्ये स्पर्धा सुरू झाली आहे. मुंबई भाजपचे अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांनी मुंबईतील नालेसफाईची पहाणी केल्यानंतर लगेचच दुसऱ्या आठवड्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईतील नालेसफाई दौरा केला. नेहमीप्रमाणे नाल्यात उतरून चमकोगिरीचा प्रयोग केला. दौरा केल्यानंतर काही घोषणाही केल्या. यामध्ये नेहमीप्रमाणे अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. राज्यातील मुख्यमंत्र्यांना नालेसफाई झाली की नाही हे पाहण्यासाठी दौरा करावा लागतो यासारखे दुर्दैव नाही. जेव्हा मुख्यमंत्र्यांचा प्रशासनावर नियंत्रण नसते त्यावेळी त्यांना प्रशासनाची कामे करण्यासाठी स्वतः मैदानात उतरावे लागते. आपण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहोत हे एकनाथ शिंदे कधीकधी स्पर्धा करण्याच्या निमित्ताने विसरून जातात. तुमचा जर प्रशासनावर व्यवस्थित ताबा असेल तर अधिकाऱ्यांची दिरंगाई करण्याची हिम्मत होत नाही. यापूर्वी राज्यातील कोणत्याही मुख्यमंत्र्यांनी नालेसफाई ची पाहणी करण्यासाठी दौरे केलेले नाहीत. उद्धव ठाकरे हे दरवर्षी नालेसफाईची पाहणी करण्यासाठी दौरा करतात म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुद्धा दौरा केलाच पाहिजे असे काहीही नाही. उद्धव ठाकरे यांचे महानगरपालिकेतील पक्षाचे पदाधिकारी आणि नगरसेवक सक्षम नसल्याने त्यांना दरवर्षी दौरा करावा लागतो. दुसरे म्हणजे उद्धव ठाकरे यांचे चार-पाच समर्थक सोडून त्यांचा कुणावरही विश्वास नाही त्यामुळे नगरसेवकांवर ते काय विश्वास ठेवणार? भाजपने शिवसेना फोडून एकनाथ शिंदे यांच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ घातली असली तरी आत्ता त्यांना या निर्णयाचा पश्चाताप होत आहे. भाजपला मुख्य म्हणजे मुंबई महानगरपालिका ही शिवसेनेच्या ताब्यातून खेचून घ्यायची आहे. त्यासाठी मुंबईतील शिवसेनेची संघटना त्यांना ताब्यात हवी आहे. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मुंबईतील पाच टक्के शिवसेना ही फोडू शकलेले नाही. त्यांच्या शिवसेनेत आलेले हवशे,गवशे आणि नवशे हे केवळ पदे मिळवण्यासाठी आणि लवकरात लवकर पैसे मिळवण्यासाठी आलेले लक्षात येत आहे. स्थानिक भाजप नेत्यांनी याबाबत आपल्या नेत्यांकडे तक्रारीही दिल्या आहेत. या शिवसैनिकाला आपण सोबत घेऊन फिरलो तर भाजपला मिळणारी मते ही कमी होतील, अशा तक्रारी अनेक पदाधिकाऱ्यांनी आपल्या नेत्यांकडे केल्या आहेत. मुंबई महानगरपालिका निवडणुकीत याचा आपल्याला फटका बसू शकेल, यासाठीच या निवडणुका कोर्टाच्या माध्यमातून पुढे ढकलल्या जात आहेत. आता दिवाळीच्या अगोदर या निवडणुका घेण्याचे आडाखे आखले जात आहेत. भाजप प्रत्येक निवडणुकीपूर्वी वेगवेगळ्या एजन्सी मार्फत आढावा घेत असते. या आढाव्यात ही प्रतिकूल रिपोर्ट्स येत आहेत. लोकसभा निवडणुकीला अजून वेळ आहे त्यानंतर विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. परंतु मुंबई महापालिका कोणत्याही परिस्थितीत भाजपला ताब्यात हवी आहे. एकनाथ शिंदे मुंबईतील शिवसेना फोडण्यास अपयशी ठरल्यामुळे गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांना कडक निरोप दिला आहे. परंतु वातावरणच विरोधात असले तर एकनाथ शिंदे कुठे डोके आपटणार? उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कितीही उसने अवसान आणले तरी कर्नाटकच्या निवडणुकांचे पडसाद हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपासून पडणार आहेत. मुंबई महानगर क्षेत्रात जवळजवळ सर्वच महानगरपालिका या प्रशासकांच्या ताब्यात आहेत.

## संपादकीय »

### घसरत्या टक्क्याचे धडे

***केंद्र सरकारकडून गेल्या काही वर्षांपासून जारी करण्यात येत असलेल्या 'राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखड्यात' (एनआयआरएफ) महाराष्ट्राची सातत्याने होणारी पीछेहाट चिंताजनक आहे.***

देशातील उच्च शिक्षण संस्थांबाबत केंद्र सरकारकडून गेल्या काही वर्षांपासून जारी करण्यात येत असलेल्या 'राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखड्यात' (एनआयआरएफ) महाराष्ट्राची सातत्याने होणारी पीछेहाट चिंताजनक आहे. अगदी अलीकडच्या काळापर्यंत शिक्षणात महाराष्ट्र अग्रेसर होता. त्याबद्दलच्या रास्त अभिमानाचे जाहीर प्रदर्शनही होत असे. उत्तर प्रदेश, बिहार आदी राज्यांतील पदव्यांचा उपहासही होत असे. हा अभिमान आणि इतरांबद्दलचा उपहास गळून पडावा, असे चित्र राष्ट्रीय क्रमवारीतून समोर आले आहे. उच्च शिक्षण संस्थांच्या एकत्रित (ओव्हरऑल) क्रमवारीत पहिल्या २५ मध्ये राज्यातील एकमेव संस्था आहे; ती म्हणजे मुंबईची 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' (आयआयटी). पहिल्या शंभरमध्ये राज्यातील ज्या ११ संस्था आहेत, त्यांपैकी प्रत्येकी चार केंद्रीय तसेच खासगी आणि राज्य सरकारच्या तीन संस्था आहेत.

**राष्ट्रीय स्तरावरील 'नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क'मध्ये (एनआयआरएफ) सलग पाचव्या वर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे शैक्षणिक घसरण सुरूच राहिली आहे. देशातील शैक्षणिक संस्थांच्या सर्वसाधारण गटात (ओव्हरऑल) विद्यापीठाचे मानांकन ३५व्या क्रमांकापर्यंत घसरले आहे.**

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मानांकन



विद्यापीठ गटात २०२०पर्यंत पहिल्या १० क्रमांकात स्थान मिळविणाऱ्या विद्यापीठाला यंदा १९व्या क्रमांकावर समाधान मानावे लागले आहे. दोन्ही क्रमवारीत विद्यापीठाची घसरण झाली असली, तरी राज्यातील पारंपरिक विद्यापीठांमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अव्वल क्रमांक कायम राखल्याचे या रँकिंगमधून स्पष्ट झाले आहे.

केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री डॉ. राजकुमार रंजन सिंग यांनी देशातील कॉलेज आणि विद्यापीठांचे एनआयआरएफ रँकिंग जाहीर केले. देशातील सर्व शैक्षणिक संस्था, विद्यापीठांच्या वर्षभरातील कामगिरीच्या आधारे मंत्रालयाकडून हे रँकिंग दिले जाते. क्रमवारी जाहीर करताना संशोधन, पेटंट, सर्वसमावेशकता, निकाल, प्लेसमेंट, विद्यार्थ्यांच्या संख्येत प्राध्यापकांचे प्रमाण, विद्यार्थिनींची संख्या, शैक्षणिक सुविधा, पायाभूत सुविधा असे निकष निश्चित करण्यात आले. त्यावरून दर वर्षी सर्वोत्कृष्ट शैक्षणिक संस्थांची क्रमवारी प्रसिद्ध केली जाते. यंदा या प्रक्रियेत आठ हजार ६८६ शैक्षणिक संस्था सहभागी झाल्या होत्या. ऑक्सफर्ड ऑफ ईस्ट अशी ओळख असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे देशपातळीवर मानांकन घसरणे, ही राज्याच्या शैक्षणिकदृष्ट्या चिंतेची बाब आहे. 'एनआयआरएफ'मध्ये विद्यापीठांच्या क्रमवारीत पुणे विद्यापीठाला एकूण सरासरी ५८.३१ गुण मिळाले आहेत.

तर, सर्वसाधारण गटात ५५.७८ गुण आहेत. त्यामध्ये पेटंट गटात विद्यापीठाला १५ पैकी ० गुण, तर प्रोजेक्ट आणि प्रोफेशनल प्रॅक्टिस गटात १.७४ गुण मिळाले आहेत. पर्सेप्शनमध्ये विद्यापीठाला केवळ १५.८२ गुण मिळाले आहेत. त्यामुळे विद्यापीठाला लोकांमध्ये चांगली प्रतिमा निर्माण करणे मोठे आव्हान आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# समीर वानखेडेंचा पाय खोलात?

## सीबीआयची मुंबई हायकोर्टात मोठी मागणी,अडचणी वाढण्याची शक्यता

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अभिनेता शाहरुख खान यांचा मुलगा आर्यन खान याच्या अटकेनंतर समीर वानखेडे यांनी लाचखोरी व खंडणीखोरी केल्याच्या आरोपांबाबत प्रथमदर्शनी पुरावे आहेत. त्यामुळे त्यांना अटकेसारख्या कठोर कारवाईपासून दिलेले अंतरिम संरक्षण मागे घ्यावे', अशी विनंती सीबीआयने बुधवारी मुंबई उच्च न्यायालयाला केली.**

अमली पदार्थ प्रकरणात आर्यनला अटक केल्यानंतर त्याची सुटका होण्यासाठी या प्रकरणाचा तपास करणारे नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोचे (एनसीबी) तत्कालीन प्रादेशिक संचालक समीर वानखेडे यांनी शाहरुखकडे २५ कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी केली, अशा आरोपाखाली सीबीआयने एफआयआर नोंदवला आहे. तो एफआयआर खोटा व आपल्याला अडकवण्यासाठी असल्याचा दावा करत वानखेडे यांनी उन्हाळी सुटीकालीन न्यायालयात याचिका केली. त्यावेळी न्यायालयाने वानखेडेंना सीबीआयच्या चौकशीत सहकार्य करण्याचे निर्देश देऊन त्यांना अटकेसारख्या कठोर कारवाईपासून ८ जूनपर्यंत अंतरिम संरक्षण दिले. तसेच वानखेडेंच्या याचिकेवर उत्तर दाखल करण्याचे निर्देश सीबीआयला दिले. त्यानुसार,



सीबीआयने आपले उत्तर दाखल केले.

'एनसीबीने ११ मे रोजी लेखी तक्रार दिल्यानंतर दखलपात्र गुन्हा घडल्याचे चौकशीत आढळले. त्यामुळेच सीबीआयने वानखेडे यांच्याविरोधात नियमित एफआयआर नोंदवला. एफआयआरमध्ये वानखेडे यांच्याविरोधात खूप गंभीर व संवेदनशील स्वरुपाचे आरोप आहेत. भ्रष्टाचार, गुन्हेगारी कारस्थान व धमक्यांद्वारे खंडणीचा प्रयत्न, असे वानखेडे व अन्य काहींवर आरोप आहेत. या आरोपांबाबत प्रथमदर्शनी पुरावेही आहेत. या प्रकरणाचा तपास प्राथमिक टप्प्यावर असून तो पूर्णपणे निष्पक्ष पद्धतीने सुरू आहे. त्यामुळे वानखेडेंना दिलेले अंतरिम संरक्षण मागे घ्यावे', असे सीबीआयने आपल्या प्रतिज्ञापत्रात नमूद केले. तसेच 'न्यायालयाकडून जिथे दखलपात्र गुन्हा नसेल अशा अत्यंत दुर्मीळ प्रकरणांतच एफआयआर रद्द केला जातो. या प्रकरणात दखलपात्र गुन्हा आहे. त्यामुळे निर्णय देण्यापूर्वी न्यायालयाने प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घ्यावे', अशी विनंतीही सीबीआयने प्रतिज्ञापत्रात केली आहे.

सीबीआयच्या विनंतीवर मुंबई हायकोर्ट आता काय निर्णय देतं याकडे सर्वांचं लक्ष लागलंय. समीर वानखेडे यांना असलेला दिलासा कायम राहणार की त्यांचा पाय आणखी खोलात जाणार हे पाहावं लागेल.

### वानखेडेंना दुहेरी दणका

**» गेल्या काही दिवसांपासून समीर वानखेडेंवर सातत्यानं आरोप होत आहेत. मंत्री नवाब मलिक दररोज पत्रकार परिषद घेऊन वानखेडेंनी केलेल्या कारवाया, त्यांनी नोकरी मिळवण्यासाठी वापरलेली कागदपत्रं याबद्दल गंभीर आरोप करत आहेत.**

**» याची चौकशी करण्यासाठी मुंबई पोलिसांनी एसीपी दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे. वानखेडे यांच्या विरोधात दाखल झालेल्या सर्व तक्रारींची चौकशी त्यांच्याकडून केली जाणार आहे. आतापर्यंत मुंबईतील चार पोलीस ठाण्यांमध्ये वानखेडे यांच्याविरोधात तक्रारी नोंदवल्या गेल्या आहेत.**

# गँगस्टर संजीव जीवाची पोलिसांपुढं हत्या, लखनऊ हादरलं

## अतिकला पत्रकार बनून संपवलं, वकील बनून कोर्टात आला

। लखनऊ । महाईन्यूज

**लखनऊ मध्ये एक खळबळजनक घटना घडली आहे. उत्तर प्रदेशच्या कायदा आणि सुव्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगणारा प्रकार घडला आहे. यामुळं पोलिसांचा कायदा सुव्यवस्था मजबूत असल्याचा दावा फोल ठरला आहे. लखनऊ मध्ये बुधवारी सायंकाळी मुख्तार अन्सारीचा जुना साथीदार कुख्यात गुंड संजीव माहेश्वरी उर्फ जीवा याची न्यायालयात गोळ्या झाडत हत्या करण्यात आली. हल्लेखोर वकिलाच्या वेशात आला होता,त्याने त्याचे काम केले आणि पोलीस फक्त बघत राहिले.**



या हत्याकांडाचे फोटो देखील समोर आले आहेत.हल्लेखोर कोर्ट परिसरात शस्त्रासह आला. तिथं त्यानं गोळीबार केला,त्यानंतर कोर्टरूममध्ये तो आला, कोर्टरुम च्या गेटवर त्यानं गोळीबार केला. संजीव जीवावर गोळीबार केला अशा एकूण सहा गोळ्या त्याच्यावर झाडण्यात आल्या. आरोपी शूटर विजय यादवचं वय केवळ १९ वर्ष आहे. तो वकिलाची कपडे घालून कोर्टात आला होता. संजीव जीवाला यापूर्वी कोर्टात हजर केलं जायचं त्यावेळी बुलेट प्रूफ जॅकेट घातलेलं असायचं, यावेळी घातलं गेलं नव्हतं आणि त्याची हत्या झाल्यानं प्रश्न चिन्ह निर्माण झालं आहे.

संजीव जीवा हत्याकांडामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. मुख्यमंत्री निवासस्थानापासून ७ किमी दूर, डिजीपी निवासस्थानापासून १० किमी दूर,कार्यवाहक पोलीस आयुक्त पियुष मोरडिया यांच्या कार्यालयापासून ५.५ किमी दूर, संयुक्त पोलीस आयुक्त उपेंद्र अग्रवाल यांच्या कार्यालयापासून १० मिनिटांच्या अंतरावर कोर्टात गोळीबार करण्यात आला.

संजीव माहेश्वरी उर्फ जीवा १९९० च्या दशकात दवाखान्यात कम्पाउंडर म्हणून काम करत होता. त्यावेळी सुरुवातीला तो औषधांच्या पुड्या बांधायचा, पुढे त्याने त्याच्या मालकाचे अपहरण केलं. कोलकाता मधील व्यापाऱ्याच्या मुलाचं अपहरण करुन खंडणी मागितल्यानंतर संजीव माहेश्वरी उर्फ जीवा चर्चेत आला होता. १९९७मध्ये गेस्ट हाऊस प्रकरणात मायावतींना वाचवणाऱ्या ब्रह्मदत्त द्विवेदी हत्याकांडात संजीव जीवा सहभागी होता. २००० मध्ये तो मुख्तार अन्सारीच्या संपर्कात मुन्ना बजरंगी मार्फत आला. २००३ मध्ये संजीव जीवा याला ब्रह्मदत्त द्विवेदी हत्याकांड प्रकरणी जन्मठेप सुनावली गेली होती. २००५ मध्ये भाजप आमदार कृष्णानंद राय हत्या प्रकरणात मुख्तार अन्सारी आणि संजीव जीवा होते, दोघेही नंतर त्यातून सुटले.

# बृजभूषणवर आठवडाभरात आरोपपत्र; सरकारच्या विनंतीनंतर कुस्तीगीरांचं ठरलं

।नवी दिल्ली। महाईन्यूज

भाजप खासदार आणि भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांच्यावर दाखल केलेल्या महिला कुस्तीगीरांच्या लैंगिक छळाच्या गुन्ह्याप्रकरणी पोलिस १५ जूनपर्यंत आरोपपत्र दाखल करणार आहेत. तोपर्यंत वेळ द्यावा, अशी विनंती बुधवारी सरकारने आंदोलक कुस्तीगीरांना केली. ती मान्य करीत कुस्तीगीरांनी आपले आंदोलन १५ जूनपर्यंत स्थगित केले.

ऑलिम्पिक पदक विजेता कुस्तीपटू बजरंग पुनिया आणि साक्षी मलिक आदी आंदोलक कुस्तीगीर आणि भारतीय किसान युनियनचे नेते राकेश टिकैत यांनी बुधवारी क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांच्यासोबत मॅरेथॉन चर्चा केली. यावेळी सरकारकडून आंदोलक कुस्तीगीरांना वरील आश्वासन देण्यात आले. त्याचप्रमाणे आरोपपत्र दाखल झाल्यानंतर ३० जूनपर्यंत कुस्ती महासंघाची निवडणूक घेतली जाईल, तसेच महासंघाची अंतर्गत तक्रार समिती स्थापन केली जाईल. त्याचे नेतृत्व एका महिलेकडे असेल, या कुस्तीगीरांच्या मागण्याही



मान्य करण्यात आल्याचे अनुराग ठाकूर यांनी पत्रकारांना सांगितले.

या कुस्तीगीरांनी शनिवारी रात्री गृहमंत्री अमित शहा यांच्याशी केलेल्या चर्चा केल्यानंतर क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांनी कुस्तीगीरांना चर्चेसाठी बोलावले होते. त्यानुसार, बुधवारी कुस्तीगीरांची बुधवारी क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांच्यासोबत चर्चा झाली. दरम्यान, सोमवारपासून पुनीया, मलिक आणि विनेश फोगट रेल्वेतील नोकरीवर रुजू झाले असले, तरी आंदोलन मागे घेतले नाही, हे त्यांनी स्पष्ट केले होते. तब्बल सहा तासांहून अधिक काळ चाललेल्या या बैठकीनंतर पुनिया म्हणाला की, सरकारच्या आश्वासनावर विश्वास ठेवून आम्ही १५ जूनपर्यंत आंदोलन करणार नाही. सरकारने आमच्याकडे एका आठवड्याचा वेळ मागितला आहे.

# कुणी बुद्धीबळात तरबेज तर कुणी रग्बी खेळाडू

मुंबई : आपल्या देशामध्ये हरहुन्नरी कलाकारांची कमतरता नाही. देशाच्या कानाकोपऱ्यातील गल्लीबोळांमध्ये कुणी उत्कृष्ट शेफ आहेत, तर कुणी एखाद्या खेळात पारंगत. बॉलिवूडमध्ये देखील असे अनेक कलाकार आहेत ते फक्त अभिनयाच्या क्षेत्रातच नाही तर इतर क्षेत्रातही पारंगत आहेत.

बॉलिवूडमधील एका कलाकारानं विश्वविजेत्या बुद्धीबळपटूबरोबर खेळला आहे. त्या कलाकाराचा खेळ पाहून सर्वांना आश्चर्याचा मोठा धक्का बसला होतता. हा कलाकार म्हणजे बॉलिवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट आमिर खान आहे. बॉलिवूडमधील अशाच कलाकारांबद्दल आणि त्यांच्यातील कलागुणांबाबत जाणून घेऊ या...



### आमिर खान बुद्धीबळपटू

सुरुवात आमिर खानपासून करू या. आमिर खान बॉलिवूडमधील मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणून ओळखला जातो. अभिनयाबरोबरच आमिर उत्कृष्ट बुद्धीबळ खेळतो. पाच वेळा विश्वविजेत्या बुद्धीबळपटू विश्वनाथ आनंद यांच्याशी तो खेळला आहे. केवळ इतकंच नाही तर चित्रीकरणातून जेव्हा केव्हा वेळ मिळतो तेव्हा आमिर बुद्धीबळाचा डाव मांडून बसतो.

### अदनान सामी उत्कृष्ट कुक

अदनान सामी हा उत्तम गायक म्हणून ओळखला जातो. परंतु तो उत्तम कुक देखील आहे. अदनान याच्या वडिलांना स्वयंपाकाची खूप आवड होती. त्यांचाच हा गुण अदनानमध्ये आला. अदनानच्या स्वयंपाकाचं वैशिष्ट्य म्हणजे तो मसाल्यांशिवाय चविष्ट जेवण बनवतो. अदनानला स्वयंपाकाचा वारसा वडिलांप्रमाणे आई आणि आजीकडून मिळाला आहे. त्या दोघीजणी उत्कृष्ट स्वयंपाक बनवायच्या.

### अक्षय कुमारही आहे कुक

बॉलिवूडचा खिलाडी अर्थात अक्षय कुमार हाअभिनयाबरोबरच मार्शल आर्ट्समध्ये चॅम्पियन आहे. याशिवाय अक्षय देखील उत्कृष्ट कुक आहे. सिनेमात येण्याआधी अक्षय कुक म्हणून काम केलं होतं. केवळ इतकंच नाही तर लॉकडाऊनमध्ये देखील अक्षयनं पाककलाकौशल्य दाखवलं होतं.

### ट्विंकल खन्ना

अक्षय कुमारप्रमाणे त्याची बायको ट्विंकल खन्ना ही देखील खूप हुशार आहे. ट्विंकल अभिनेत्री तर आहेच शिवाय ती प्रसिद्ध लेखिका देखील आहे. केवळ इतकंच नाही तर ती प्रसिद्ध इंटिरिअर डिझायनर देखील आहे. खास गोष्ट म्हणजे ट्विंकलनं याचा प्रशिक्षण घेतलेलं नाही. तिला यात रस होता आणि त्यातच तिनं करीअर देखील केलं.

### सोनाक्षी सिन्हा चित्रकार

अभिनयात येण्याआधी सोनाक्षी कॉश्चुम डिझायनर होती. तिला त्या क्षेत्रात प्रसिद्ध व्हायचं होतं. पण सलमान खाननं तिचं आयुष्य बदलून टाकलं आणि ती अभिनयाच्या क्षेत्रात आली. याशिवाय सोनाक्षी उत्तम चित्र काढते. तिच्या चित्रांचं प्रदर्शनही भरलं होतं.

शाहिद कपूर आहे डीजे

# फायनली! बहरला हा मधुमास नवा गाण्यावर माधुरीनं केला डान्स



केदार शिंदे यांनी दिग्दर्शित केलेल्या महाराष्ट्र शाहीर या सिनेमाची आणि सिनेमातल्या गाण्याची सोशल मीडियावर खूप्रचंड च चर्चा झाली. या सिनेमात अंकुश चौधरी आणि सना शिंदे मुख्य भूमिकेत आहेत. गेल्या काही महिन्यांपासून सोशल मीडियावर चित्रपटातल्या एका गाण्यानं धुमाकूळ घातला होता. 'बहरला हा मधुमास नवा' या गाण्यानं प्रेक्षकांना वेड लावलं आहे. प्रत्येकजण या गाण्याची हूकस्टेप फॉलो करत व्हिडिओ शेअर करत होता. देशातच नव्हेतर बाहेरच्या देशातही या गाण्याची क्रेझ पाहायला मिळाली. अनेक बॉलिवूड अभिनेत्रींनीही या गाण्यावर रील्स केले होते. पण मराठमोळी माधुरी दीक्षित हिनं मात्र या गाण्यावर अद्यापही रील शेअर केलं नव्हतं.

माधुरी दीक्षित नेहमीच ट्रेंड फॉलो करताना दिसते. सोशल मीडियावर ट्रेंडिंग व्हिडिओवर ती रील करताना दिसते. असं असताना तिनं 'बहरला हा मधुमास नवा' या गाण्यावर मात्र अद्यापही रील व्हिडिओ बनवला नव्हता. त्यामुळं चाहतेही तिला कमेंट करत या गाण्यावर रील व्हिडिओ करण्यास सांगत होते. अखेर माधुरीनं चाहत्यांच्या आग्रहामुळं का होईना 'बहरला हा मधुमास नवा' यावर रील तयार केलं. माधुरीनं नुकतंच इन्स्टाग्रावर हे रील शेअर केलं आहे. हे रील शेअर करताना तिनं म्हटलं आहे की, 'बहरला हा मधुमास नवा' फायनली हा ट्रेंड फॉलो करतेय.

# सोनाली पाटील करणार लग्न



मराठी टेलिव्हिजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री सोनाली पाटीलने अलीकडेच तिच्या सोशल मीडिया हँडलवर चाहत्यांसह एक LIVE सेशन केले होते. यामध्ये तिने तिच्या लग्नाविषयीदेखील भाष्य केले. चाहत्यांशी संवाद साधताना सोनालीने लग्नाची योजना आणि ती तिच्या आयुष्यातील खास व्यक्तीसोबत कधी लग्न करणार याबद्दल सांगितले. या लाइव्ह दरम्यान एका चाहत्याने सोनालीला विचारले, 'तू यावर्षी लग्न करणार आहेस का?' तर या चाहत्याला उत्तर देताना सोनालीने सांगितले की, ती या वर्षी लग्न करणार नाही पण ती २०२४ मध्ये लग्न रणार आहे. अभिनेत्री म्हणाली की, 'मी यावर्षी लग्न करणार नाही. यावर्षी लग्न होणार नाही पण २०२४ मध्ये नक्की. २०२४ मध्ये मी लग्न करणार आहे.' सोनालीने ही आनंदाची बातमी चाहत्यांसोबत शेअर करुन त्यांना आश्चर्यचकित केले. मात्र अद्याप तिने तिच्या आयुष्यात अशी कोणती व्यक्ती आहे का, याचा उलगडा मात्र केलेला नाही. तिच्या आयुष्यातील विशेष व्यक्तीचे नाव किंवा चेहरा उघड केलेला नाही, मात्र तिने २०२४ मध्ये लग्न करणार असं म्हटलं म्हणजे लवकरच ती तिच्या जोडीदाराबद्दल तपशील उघड करू शकते.

# 'लावणी क्वीन' गौतमी पाटील पडद्यावर झळकणार

गौतमी पाटील (हे नाव गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. अश्लील नृत्यामुळे चर्चेत असलेली गौतमी आता सिनेमात झळकणार आहे. 'घुंगरु' असे तिच्या आगामी सिनेमाचे नाव आहे. या सिनेमाची घोषणा झाल्यापासून चाहत्यांना या सिनेमाची उत्सुकता लागली आहे.

गौतमीच्या 'घुंगरु' या सिनेमाचं शूटिंग सोलापूर (SOLAPUR), माढा (MADHA), हंपीसह (HAMPI) परदेशात झालं आहे. या सिनेमात गौतमी पाटील (GAUTAMI PATIL MOVIE) नक्की कोणती भूमिका साकारणार हे अद्याप समोर आलेलं नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 'घुंगरु' या सिनेमात गौतमी बाबा गायकवाडसोबत स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे.

गौतमी आणि बाबा गायकवाड यांच्यासह 'घुंगरु' या सिनेमात सुदाम केंद्रे, उषा चव्हाण, वैभव गोरे, शीतल गीते हे कलाकारदेखील झळकणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. हा सिनेमाचं कथानक कलावंत आणि लोककलावंतांच्या आयुष्यावर भाष्य करणारं असू शकतं. 'घुंगरु' या सिनेमाच्या लेखन-दिग्दर्शनाची धुरा बाबा गायकवाड यांनी सांभाळली आहे. एका व्हायरल व्हिडीओमुळे गौतमी पाटील रातोरात प्रसिद्धीझोतात आली होती. पण गेल्या काही दिवसांपासून ती वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. सोशल मीडियावर तिला प्रचंड ट्रोलिंगचा सामना करावा लागत असला तरी तिचा मोठा चाहतावर्ग आहे. गौतमी पाटील ही सोशल मीडियावर ओळखीचा आणि प्रसिद्ध चेहरा आहे. आपला डान्स आणि एक्स्प्रेशन्सने गौतमीने तरुणाईला वेड लावलं आहे. 26 वर्षीय गौतमी ही डान्सर असून लावणी डान्सर म्हणून तिला ओळखलं जातं. यूट्यूब, इन्स्टाग्राम, फेसबुक यांसारख्या सोशल प्लॅटफॉर्मवरतिचे व्हिडिओ तुफान व्हायरल होत असतात. इतकंच काय तर अनेक कार्यक्रमांमध्ये गौतमीला डान्स करण्यासाठी बोलवलं जातं आणि त्यासाठी तिला मानधन दिलं जातं. दरम्यान काही दिवसांपूर्वी व्हिडीओमधील डान्स स्टेप्समुळे गौतमी वादाच्या भोवऱ्यात अडकली. सार्वजनिक कार्यक्रमात डान्स करताना गौतमीने आक्षेपार्ह डान्स स्टेप्स केल्या, ज्यामुळे गौतमीला माफी मागावी लागली होती.



# ऐतिहासिक ओव्हल मैदान स्तब्ध!

## » रोहितच्या नेतृत्वाखाली WTC फायनलमध्ये आश्चर्यकारक योगायोग

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**धोनीचा ओडिशाच्या बालासोर जिल्ह्यात झालेला रेल्वे अपघात हा भारताच्या रेल्वे इतिहासातील गेल्या २८ ते ३० वर्षांतला हा सर्वात भीषण अपघात होता. या रेल्वे अपघातात अनेक रेल्वे डब्यांचा पार चक्काचूर झाला होता. अशा या भीषण अपघातात जवळपास ३०० प्रवाशांचा मृत्यू झाला. भारतीयांसाठी हृदय पिळवटून टाकणारी ही घटना होती. क्रिकेट खेळाडूंनी आणि क्रिकेटप्रेमींनी या घटनेबद्दल शोक व्यक्त करत मृतांबद्दल आणि त्यांच्या कुटुंबीयांबद्दल संवेदना व्यक्त केली आहे.**



भारत आणि ऑस्ट्रेलियात वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची फायनल लंडनच्या ऐतिहासिक ओव्हल मैदानावर होत आहे. भारताने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय आहे. पण सामना सुरू होण्यापूर्वी भारतीयांसाठी आणि भारतीय संघासाठी अतिशय भावुक करणारा एक क्षण ठरला. ओव्हलच्या या ऐतिहासिक मैदानात ओडिशातील भीषण रेल्वे अपघातातील मृतांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी एक मिनिट उभं राहून मौन राखत खेळाडूंनी आणि क्रिकेटप्रेमींनी आपल्या संवेदना व्यक्त केल्या.

ओव्हल मैदानावर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची फायनल सुरू होण्यापूर्वी दोन्ही संघ मैदानावर आले. फायनलचा आजचा पहिला दिवस आहे. भारतीय संघातील सर्व खेळाडूंनी हातावर काळी पट्टी बांधलेली आहे. फक्त भारतीय संघानेच नव्हे तर ऑस्ट्रेलियाच्या संघातील सर्व खेळाडूंनीही काळीपट्टी बांधलेली आहे. ही काळीपट्टी ओडिशाच्या बालासोरमध्ये झालेल्या भीषण रेल्वे अपघातातील मृतांबद्दल शोक व्यक्त करणारी आहे.

पहिल्या दिवसाचा खेळ सुरू होण्यापूर्वी ओव्हल मैदानात एक मिनिट उभं राहून मौन पाळत ओडिशा रेल्वे अपघातातील मृतांना दोन्ही संघांनी आणि मैदानासह स्टेडियममध्ये उपस्थितीत असलेल्या क्रिकेटप्रेमींनी आदरांजली वाहिली.

यावेळी संपूर्ण मैदान स्तब्ध झाल्याने हा भारतीयांसाठी अतिशय भावुक क्षण ठरला. ओडिशातील घटनेने भारतीयांना मोठा धक्का बसला आहे. या घटनेबद्दल संपूर्ण देशातून हळहळ व्यक्त होत आहे. अशावेळी भारतीय आणि ऑस्ट्रेलियाच्या संघासह ओव्हल मैदानावर, स्टेडियममध्ये उपस्थित असलेल्या सर्वांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आणि संपूर्ण जगाला एकतेचा अन् मानवतेचा संदेश दिला.

### बीसीसीआयनेही केलं ट्विट

»बीसीसीआयनेही ट्विट करत माहिती दिली आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये पहिल्या दिवसाचा खेळ सुरू होण्यापूर्वी भारतीय संघाने ओडिशाच्या बालासोरमध्ये झालेल्या भीषण रेल्वे दुर्घटनेतील मृतांना आदरांजली वाहिली. भारतीय संघाने मृतांना आदरांजली वाहत त्यांचे कुटुंबीय आणि मित्रांबद्दल मनापासून शोक व्यक्त केला. तसंच एकतेचा संदेश देत भारतीय संघाने हाताला काळी पट्टी बांधल्याचं बीसीसीआयने म्हटलं आहे. बीसीसीआयने ही माहिती देताना भारतीय संघाचा फोटोही ट्विट केला आहे.

### ओडिशातील रेल्वे अपघाताची CBI चौकशी

»ओडिशाच्या बालासोरमध्ये गेल्या आठवड्यात भीषण अपघात झाला. कोरोमंडल एक्स्प्रेससह तीन रेल्वे गाड्यांमध्ये हा अपघात झाला. या अपघातात २८८ प्रवाशांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघातातील मृतांपैकी २०५ मृतदेहांची ओळख पटवून ती नातेवाईकांना सोपवण्यात आली आहेत. पण हा अपघात इतका भीषण होता की अजूनही ८३ मृतांची ओळख पटू शकलेली नाही. ओडिशा सरकारकडून हेल्पलाइन क्रमांक जारी केला आहे. रेल्वे अपघातातील पीडितांच्या कुटुंबीयांनी 18003450061 OR 1929 या क्रमांकावर फोन करावा आणि मृतदेहांची ओळख पटवण्यासाठी सहकार्य करावं, असं आवाहन ओडिशा सरकारकडून करण्यात आलं आहे.

---

# फ्रेंच खुली टेनिस स्पर्धा: जाबेऊरला पराभवाचा धक्का देत हद्दाद माइआ उपांत्य फेरीत

## »महिलांत श्वीऑनटेक, तर पुरुषांत अल्कराझचीही आगेकूच

। पॅरिस ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**ब्राझीलच्या १४व्या मानांकित बीएट्रिझ हद्दाद माइआ आणि पोलंडच्या अग्रमानांकित इगा श्वीऑनटेकने बुधवारी फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेतील महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. तर, स्पेनच्या अग्रमानांकित कार्लोस अल्कराझने आपली लय कायम राखताना पुरुष एकेरीची उपांत्य फेरी गाठली.**



महिला एकेरी गटात हद्दाद माइआने सर्वात धक्कादायक निकालाची नोंद केली. तिने ट्युनिशियाच्या सातव्या मानांकित आणि जेतेपदासाठी प्रबळ दावेदार ओन्स जाबेऊरवर ३-६, ७-६ (७-५), ६-१ असा विजय साकारला. या सामन्यात जाबेऊरचे पारडे जड मानले जात होते, पण हद्दाद माइआने आपल्या आक्रमक खेळाने विजय साकारला. जाबेऊरने गेल्या वर्षी अमेरिकन खुल्या आणि विम्बल्डन टेनिस स्पर्धेची अंतिम फेरी गाठली होती. त्यामुळे हद्दाद माइआसाठी हा मोठा विजय आहे. सामन्यात हद्दाद माइआची सुरुवात चांगली झाली नाही. मात्र, पहिला सेट गमावल्यानंतर दुसरा सेट तिने टायब्रेकरमध्ये जिंकत सामना बरोबरीत आणला. तिसऱ्या सेटमध्ये जाबेऊरला तिने पुनरागमनाची कोणतीही संधी न देता विजय साकारला. उपांत्य फेरीत हद्दाद माइआसमोर श्वीऑनटेकचे आव्हान असेल. उपांत्यपूर्व लढतीत श्वीऑनटेकने अमेरिकेच्या सहाव्या मानांकित कोको गॉफवर ६-४, ६-२ असा सरळ सेटमध्ये विजय नोंदवत आगेकूच केली. पुरुष एकेरीच्या सामन्यात जेतेपदाच्या प्रबळ दावेदारांपैकी एक असलेल्या अल्कराझने ग्रीसच्या पाचव्या मानांकित स्टेफानोस त्सित्सिपासला ६-२, ६-१, ७-६ (७-५) असे पराभूत केले.

उपांत्य फेरीत त्याच्यासमोर २२ ग्रँडस्लॅम विजेत्या सर्बियाच्या नोव्हाक जोकोव्हिचचे आव्हान असेल. सामन्यातील पहिले दोन सेट अल्कराझने सहज जिंकत आपले मक्तेदारी सिद्ध केली. मात्र, तिसऱ्या सेटमध्ये त्सित्सिपासने त्याच्यासमोर आव्हान उपस्थित केले. एकवेळ अल्कराझने मजबूत आघाडी होती, पण त्सित्सिपासने सेट टायब्रेकपर्यंत खेचला.

# पाकने आयसीसीसमोर ठेवली नवी अट



। लंडन।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

पीसीबीचे अध्यक्ष नजम सेठी यांनी आयसीसीचे चेअरमन ग्रेग बार्कले यांच्यासमोर एक नवीन अट ठेवली आहे. तसेच त्यांनी एकदिवसीय विश्वचषकादरम्यान अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारताविरुद्ध खेळण्याबद्दल आपली भीती व्यक्त केली आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेने सूत्रांच्या हवाल्याने ही माहिती दिली आहे. पाकिस्तानला आपले सामने कोलकाता, चेन्नई आणि बेंगळुरू येथे खेळायचे आहेत. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर सामने खेळायचे नाहीत.

उल्लेखनीय म्हणजे, आयसीसीचे अध्यक्ष ग्रेग बार्कले आणि आयसीसीचे महाव्यवस्थापक ज्योफ ॲलार्डिस यांनी अलीकडेच पीसीबी अधिकाऱ्यांची भेट घेतली होती. ज्यामध्ये पाकिस्तान एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतील त्यांच्या सामन्यांसाठी तटस्थ ठिकाणे शोधणार नाहीत, असे आश्वासन घेतले होते.